कु.आ.प्रा.७

विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावरील भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या बैठक आयोजित करण्यास विलंब करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र.अहत-१६०९/प्र.क्र.८२/०९/११-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ३ ऑगस्ट, २००९

वाचा :- शासन परिपत्रक क्र.सीडीआर-१०९६/प्र.क्र.२०/९६/११, दि.१३.१२.१९९६

**शासन परिपत्रक :-**

उपरोक्त संदर्भाधीन शासन परिपत्रक दि.१३.१२.१९९६ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये विभाग, जिल्हा व तालुका स्तरावरील भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या सदस्य, कार्यकक्षा त्याचप्रमाणे बैठका आयोजनाबाबत व अहवाल देण्याबाबत तरतूदी करण्यात आल्या आहेत.

संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावरील भ्रष्टाचार निर्मूलन समितीची बैठक आयोजन करण्याबाबत जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे अशा अधिकाऱ्याकडून बैठक बोलाविण्यास विलंब झाल्यास शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध कायदयातील कलम १० (२), (३) मधील तरतुदीनुसार त्या अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या WWW.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २००९०८०३१८०४५९००१ असा आहे.

आदेशानुसार ,

(प्र.ल.पाठक)
उप सचिव

प्रति,

राज्यपालाचे प्रधान सचिव,
मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
*सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग/कार्यालय प्रमुख
सामान्य प्रशासन विभागातील सर्व प्रशासकीय कार्यालये .
सामान्य प्रशासन विभागातील कार्यासने, निवडनस्ती